संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६८ वा ● ● शनिवार दि. ७ ऑक्टोबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# सोनारसिद्ध मंदिरात धाडसी चोरी

## १५ किलो चांदी व १२ तोळे सोन्याचे दागिने लंपास : चोरीने परिसरात घबराट

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** आटपाडी पोलिसांना आव्हान देत, चोरट्यांनी सोनारसिद्ध मंदिरात धाडसी चोरी करत दरोडा टाकला. यामध्ये चोरट्यांनी १५ किलो चांदी व १२ तोळे सोन्याचे दागिने लुटले. या धाडसी चोरीमुळे आटपाडी पोलिसांच्या पुढे चोरट्यांनी आव्हान निर्माण केले आहे.

आटपाडी शहरापासून पुजारवाडी ग्रामपंचायतीच्या अंतर्गत सोनारसिद्ध मंदिर असून या ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी असते. भाविकांची सोनारसिद्ध देवावर श्रद्धा असल्याने या ठिकाणी भाविक अनेक नवस बोलत असतात. यामध्ये देवाला सोने-चांदीचे दागिने घालायचे नवस देखील बोलले जात असल्याने देवाला चांदी व सोन्याचे दागिने येत असतात. यातील काही दागिने देवाला दररोज आरती केल्यानंतर पुजाऱ्यांच्या हस्ते परिधान केले जातात.

दिनांक ०५ रोजीच्या रोजी रात्री सर्व पुजारी झोपी गेले होते. यामध्ये मंदिराच्या आत मध्ये एक पुजारी तर मंदिराच्या समोरील बाजूला पाच पुजारी झोपले होते. यावेळी चोरट्यांनी रात्रीच्या २.३० च्या सुमारास मंदिराशेजारी असलेल्या डीपीचे वीज कनेक्शन बंद केले व मंदिरामध्ये समोरच्या बाजूने झाडावरून प्रवेश केला. मंदिरामध्ये प्रवेश करताना देवाचा मुख्य दरवाजाला कुलूप नसल्याने या ठिकाणी प्रवेश करत मंदिरातील चांदीचा देवाचा मोठा घोडा, देवाचा फेटा, लहान घोडा, चांदीचा गणपती,चांदीची माळ, चांदीचे करदुडे, सोन्याचो बोरमाळ, सोनायचे गंठण, सोन्याचे डोरले, सोन्याचा लक्ष्मीहार, कानातील फुलांचा जोड,सोन्याचे बदाम असे सोने-चांदीचे दागिने लंपास केले. यामध्ये १५ किलो चांदी व १२ तोळे सोन्याचे दागिने अशी सात लाख रुपयांचे दागिने चोरून नेले. सदरची घटना ही आज पहाटेच्या सुमारास उजेडात आली. या घटनेची नोंद आटपाडी पोलिसात झाली असून पोलीस घटनेचा अधिक तपास करत आहेत.



**आटपाडी : येथील सोनारसिद्ध मंदिरातील मुख्य गाभाऱ्यातील सोने व चांदीचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.**

### घटनास्थळी यांची भेट

घटनास्थळी माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख, जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील, माजी समाज कल्याण सभापती ब्रम्हानंद पडळकर, अनिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी पद्मा कदम, पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांनी भेट दिली. ठसे तज्ञांना पाचारण करण्यात आले होते. श्वान पथकाने मंदिरासमोरील रस्त्यापर्यंत मागोवा काढला. परंतु चोरांचा सुगावा लागला नाही.

### सीसीटीव्ही बंद

मंदिरामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण मंदिर परिसर व मुख्य गाभाऱ्यात सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. परंतु मागील आठवड्यात झालेल्या पावसाने या ठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही बंद पडले होते. याची माहिती चोरट्यांनी संकलित केली असण्याची शक्यता असल्याने या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही बंद असल्याने याचा चोरट्यांनी फायदा घेतला.

### प्रवेशद्वाराची कुलूपे सुस्थितीत

सोनारसिद्ध मंदिराला मुख्य दरवाजासह दोन लहान दरवाजे आहेत. रात्रीच्या वेळीस मंदिर बंद झाल्यानंतर या तीनही दरवाजांना पुजारी कुलुपे लावून बंद करत असतात. चोरट्यांनी या तीनही दरवाजापैकी कोणत्याही दरवाजे कुलूप तोडण्याची नाहीत. चोरट्यांनी मंदिराच्या समोरील बाजूला असणाऱ्या झाडावरून चोरट्यांनी मंदिरामध्ये प्रवेश केल्याची शक्यता आहे.

### पहाटे तीन वाजता चोरी झाल्याचे समजले.

मंदिरामध्ये मोठा नगारा आहे . सदरचा नगरा हा पहाटे तीन वाजता वाजविण्यात येतो. तीन वाजलेपासून देवाच्या विधिवत पूजेला सुरुवात होते. यावेळी पुजारी तीन वाजता नगारा वाजविण्यासाठी उठविल्यानंतर त्याला मंदिरामध्ये चोरी झाल्याचे लक्षात आल्यावर त्याने इतर पुजारी यांना उठविले. यानंतर मुख्य पुजारी यांनी आटपाडी सोनारसिद्ध येथील नागरिकांना याची कल्पना देत याबाबत आटपाडी पोलिसांना माहिती देण्यात आली.

### चोरट्यांची टोळी असल्याची शक्यता?

सोनारसिद्ध मंदिरामध्ये झालेल्या चोरीमध्ये अंदाजे १५ किलो चांदी व १२ तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. परंतु चोरी ही एकट्या चोरट्याने केली नसल्याचे प्राथमिक अंदाज असून एवढी मोठी चोरी करण्यासाठी अंदाजे दोन-तीन जणांचे टोळके असल्याची शक्यता आहे.

### मार्गावरील सीसीटीव्हीची तपासणी

सोनारसिद्ध मंदिराकडे येणाऱ्या पिंपरी येथील मुख्य रस्त्यावरील म्हणजेच सांगोला हद्दीपर्यंत पोलिसांनी तपास केला. यामध्ये सांगोला हद्दीजवळ असणाऱ्या एका हॉटेल मधील सीसीटीव्हीची देखील तपासणी करण्यात आली. यामध्ये कोणतेही गाडी आल्याचे अथवा गेल्याचे दिसत नाही.

# गोरेगावात इमारतीला लागलेल्या भीषण आगीत आठ जणांचा मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** गुरुवारी रात्री मुंबईतील गोरेगाव येथे असणाऱ्या समर्थ नावाच्या इमारतीतील पार्किंगला भीषण आग लागली. या दुर्घटनेतून ३० जणांना वाचवण्यात यश आलं असून १४ जण जखमी झाले. आगीत होरपळून आठ जणांचा मृत्यू झाल्याती माहिती समोर आली.



**मुंबई : येथील गोरेगावात इमारतीला लागलेल्या आगीमध्ये पार्किंग मध्ये जळून खाक झालेल्या गाड्या**

आगीचं स्वरुप इतकं होतं की सुमारे ३० हून अधिक बाईक आणि ४ कार त्यात जळून खाक झाल्या आहेत.

प्राथमिक माहितीनुसार आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० हून अधिक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. ज्याच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली. सध्या इथं कुलिंगचं काम सुरू असून, आग कशी लागली याचा स्थानिक पोलीस आणि अग्निशमन दल तपास घेत आहे.

इमारतीच्या पार्किंगमध्ये आग लागली असावी असा प्राथमिक अंदाज असून तिथं असणाऱ्या जुन्या कपड्यांनी ती आणखी धुमसत गेली. आणि काही वेळातच संपूर्ण पार्किंग लॉटसह पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यापर्यंत ही आग पोहोचली.




# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला प्रकारात देशमुख महाविद्यालयाचे यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत ४३ वा सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द वाळवा येथे संपन्न झाला. यामध्ये लोककला या प्रकारामध्ये डोंबारी नृत्य सादर करुन श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडीच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली.



**आटपाडी : ऐतवडे खुर्द वाळवा येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला सादर करताना देशमुख महाविद्यालयाचे विद्यार्थी**

डोंबारी नृत्य सादरीकरणासाठी रसिकांचा भरभरुन उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या लोककला (डोंबारी नृत्य) प्रकारामध्ये तृतीय क्रमांक मिळवून दि. ११ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत दहिवडी कॉलेज,दहिवडी येथे संपन्न होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले यांनी सर्व विद्यार्थी कलाकारांचे तसेच महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग समितीचे अभिनंदन केले. डोंबारी नृत्य या लोककला प्रकारासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय जाधव, डॉ. विजय लोंढे, समितीमधील सर्व सदस्य तसेच माजी विद्यार्थी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संस्थेचे चेअरमन अमरसिंह देशमुख , उपाध्यक्ष डॉ. सुभाष कारंडे, सचिव हणमंत पवार, निरीक्षक अशोक चौगुले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन व कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# औषधे मिळाली नाहीत, तर जिल्हाधिकाऱ्यांना फोन करा : शंभूराज देसाई

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक ग्रामीण रुग्णालयांत सहा महिने पुरेल इतका औषधसाठा करणाऱ्याच्या सूचना केल्या असून त्यासाठी जिल्हा नियोजनमधून निधी देणार असल्याची माहिती पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. याचवेळी त्यांनी शासकिय रुग्णालयात औषधे मिळत नसल्यास थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन करा, असे आवाहन देसाई यांनी नागरिकांना केले.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलिस अधीक्षक समीर शेख, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. रवींद्रनाथ चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे उपस्थित होते. त्यानंतर देसाई यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला.

देसाई म्हणाले, जिल्हा रूग्णालयास भेटीत त्या ठिकाणच्या औषधसाठ्याची पाहणी केली. येथील औषधसाठा दोन महिने पुरेल इतका असून, उर्वरित उपजिल्हा आणि ग्रामीण रूग्णालयातही तेवढाच औषधसाठा आहे. हा औषधसाठा किमान सहा महिने पुरेल इतका असणे आवश्यक असल्याने त्यासाठी जिल्हा नियोजनमधून ११ कोटी रुपये देण्यात आले आहेत. यातून स्थानिक पातळीवर आवश्यक औषध खरेदी करण्याच्या सूचना केल्या.




# आटपाडी पोलिसांनी नोंद झालेला गुन्हा रद्द करावा

## आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय संघटनेची मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी पोलिसांनी खातरजमा न करता काही अनधिकृत न्युज पोर्टल व काही पत्रकारांमार्फत चुकीचे गुन्हे नोंद करू नयेत अशी मागणी, आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय संघटनेने निवेदनाद्वारे आटपाडी पोलिसांना केली आहे.



**आटपाडी : आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय संघटनेच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर**

याबाबत अधिक माहिती अशी, जिल्हा परिषद प्राथमिक बाळेवाडी-कोळेकरवस्ती येथे कार्यरत असणारे शिक्षक बाबासो शेख यांच्या विरुद्ध शाळेतील मुलीची व पालकांची तसेच गावाची कोणतीही तक्रार नसताना त्यांना जाणीवपूर्वक बदनाम करण्याचे व आर्थिक लाभाच्या हेतूने काही पत्रकारांनी बदनामी करत यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद केली आहे.

खरे तर या प्रकरणी आटपाडी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने एक वेळा व जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने याप्रकरणी चौकशी अहवाल तयार करून दिला असून याप्रकरणी सदर शिक्षकास क्लीनचीट दिली आहे.

सदर प्रकरणी आटपाडी पोलिसांनी याबाबत खातरजमा करून नोंद झालेला गुन्हा रद्द करावा. अन्यथा, आटपाडी तालुका प्राथमिक शिक्षक सर्व संघटना समन्वय समितीच्या वतीने सनदशीर मार्गाने आंदोलन करू असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती,तहसीलदार आटपाडी, गटविकास अधिकारी आटपाडी व गटशिक्षणाधिकारी आटपाडी यांना देण्यात आल्या आहेत.

यावेळी शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु टी जाधव , शिक्षक बँक संचालक शरद चव्हाण ,शिक्षक समितीचे तालुकाध्यक्ष संजय कबीर, शिक्षक संघ थोरात गटाचे रसिक सपाटे ,शिक्षक संघ शि द गटाचे तालुकाध्यक्ष यशवंत गोडसे ,जुनी पेन्शन हक्क संघटनचे अध्यक्ष नितीन गळवे, शिक्षक भारतीचे संजय पिंजारी, शिक्षक नेते प्रकाश विभूते, शामराव ऐवळे , प्रविण बाड ,नारायण कदम , दिपक कबीर, दत्तात्रय सुतार आदी उपस्थित होते.

# आम. गोपीचंद पडळकर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन : विनायक पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे युवा नेते विनायक पाटील यांनी दिली. कुस्ती मैदानासाठी, आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये ते बोलत होते.

बैठकीसाठी माजी सभापती ब्रम्हदेव पडळकर, विष्णू अर्जुन, यू.टी.जाधव, चंद्रकांत दौंडे, नाथा सरगर, राजेंद्र दौंडे, संतोष शिंदे, विलास काळेबाग, सागर तळे, चंद्रकांत काळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यामध्ये प्रथम क्रमांकासाठी ची पाच लाख रुपयांची कुस्ती उपमहाराष्ट्र केसरी पै.किरण भगत विरुद्ध जागतिक कुस्ती सुवर्ण पदक विजेता पै.उमेश मथुरा यांच्यात होणार आहे. तसेच प्रथम क्रमांकासाठीची आणखी पाच लाख रुपयांची कुस्ती ही महाराष्ट्र केसरी,कोल्हापूर पै.पृथ्वीराज पाटील विरुद्ध पै.विकी चहर यांच्यात होणार आहेत. तीन लाख रुपयांची कुस्ती ही पै.बालाजी मेटकरी विरुद्ध पै.समीर शेख यांच्यात होणार आहे. एक लाख रुपयासाठी ची कुस्ती ही पै.सतीश मुढे आटपाडी विरुद्ध पै.रामदास पवार सांगली यांच्यात होणार आहे. तर या कुस्ती मैदानात पन्नास हजार रुपयांची कुस्ती ही पै. हणमंत काळे विरुद्ध पै. उमाजी चव्हाण यांच्यात होणार आहे. तर पंचवीस हजार रुपयासाठी एकूण आठ कुस्त्या होणार आहेत.



आम. गोपीचंद पडळकर



ब्रम्हदेव पडळकर



विनायक पाटील

या कुस्ती मैदानाचे उद्घाटन खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते होणार असून माजी मंत्री आम. विजयकुमार देशमुख, आम. जयकुमार गोरे, माजी आम. राजेंद्रआण्णा देशमुख यांच्यासह वस्ताद नामदेव बडरे, छोटा रावसाहेब मगर, डीवायएसपी हिंदकेसरी पै. सुनील साळुंखे हे उपस्थित राहणार आहेत.

सदरचे कुस्ती मैदान हे रविवार दिनांक ०८ रोजी दुपारी २.०० पासून अंबाबाई कुस्ती आखाडा या ठिकाणी या मैदान सुरु होणार आहे. तरी सदर कुस्ती मैदानासाठी मोठ्या संख्येने कुस्ती शौकीनांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक भाजपचे युवा नेते विनायक पाटील यांनी केले आहे.

# संपादकिय

## दिल्ली मद्य घोटाळा प्रकरण?

दिल्ली सरकारच्या कथित मद्यविक्री घोटाळा प्रकरणात आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांना दिल्ली न्यायालयाने पाच दिवसांची सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) कोठडी सुनावली आहे. सिंह यांच्या चौकशीसाठी ईडीने १० दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने १० ऑक्टोबरपर्यंत सिंह यांना कोठडी दिली. तसेच गुरुवारी (५ ऑक्टोबर) दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या जामीन अर्जावरही सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने ईडी आणि सीबीआय यांना सडेतोड प्रश्न विचारून फैलावर घेतले. तसेच या प्रकरणाची पुढची सुनावणी १२ ऑक्टोबर रोजी होणार असल्याचे सांगितले.

संजय सिंह यांना ४ ऑक्टोबर, तर सिसोदिया यांना २६ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली आहे. दिल्लीसाठी २०२१-२२ साली तयार केलेल्या 'दिल्ली अबकारी धोरण' निर्मिती आणि धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये भ्रष्टाचार केल्याचा आरोप दोन्ही नेत्यांवर ठेवण्यात आला आहे. हे धोरण नोव्हेंबर २०२१ मध्ये लागू करण्यात आले होते; मात्र त्यानंतर जुलै २०२२ मध्ये ते रद्द करण्यात आले.

दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांना जुलै २०२२ मध्ये एक अहवाल सादर केला होता. मद्य परवाना देत असताना, त्या बदल्यात कमिशन स्वरूपात पैसे घेतल्याचा आरोप तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावर या अहवालात करण्यात आला होता. अहवालात दिलेल्या माहितीनुसार, उत्पादन शुल्कमंत्री या नात्याने मनीष सिसोदिया यांनी आपल्या अखत्यारीत मनमानी पद्धतीने आणि एकतर्फी निर्णय घेतले; ज्यामुळे राज्याच्या तिजोरीचे ५८० कोटींपेक्षा अधिक महसुलाचे नुकसान झाले. 'आप'चे दिल्ली सरकार आणि त्यांच्या पक्षातील नेत्यांना मद्य व्यवसायातील मालक व दुकानदार यांच्याकडून 'किकबॅक' आणि 'कमिशन'च्या बदल्यात पैसे मिळाले. या कमिशनच्या बदल्यात मद्यविक्री परवानाधारकांना अनुचित लाभ देण्यात आला. तसेच करोना महामारीच्या काळात मद्यविक्री करणाऱ्या दुकानदारांवरील दंड माफ करून, त्यांना दिलासा देण्यात आल्याचा आरोपही या अहवालात करण्यात आला होता. या गैरव्यवहारातून जे पैसे मिळाले, ते गोवा आणि पंजाब राज्यात २०२२ साली झालेल्या निवडणुकीत वापरण्यात आल्याचाही आरोप ठेवण्यात आला होता. नवे मद्य धोरण २०२० मध्ये तयार करण्यात आले होते; जे २०२१ रोजी लागू झाले. दिल्लीत मद्याच्या दुकानांची ३२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली असून, प्रत्येक झोनमध्ये जास्तीत जास्त मद्याची २७ दुकाने उघडण्यात येणार होती. नवीन मद्य धोरणानुसार दिल्लीतील सर्व दारूची दुकाने खासगी करण्यात आली. सरकार मद्यविक्रीपासून बाहेर पडणार, हे यातून सूचित करण्यात आले. दारूमाफियांना आळा घालणे आणि काळाबाजार संपवून सरकारचा महसूल वाढविणे, तसेच ग्राहकांना सुविधा देऊन मद्यविक्रेत्यांसाठीचे वितरण सुनिश्चित करणे, अशी नव्या धोरणाची उद्दिष्टे होती.

८ जुलै २०२२ रोजी मुख्य सचिव नरेश कुमार यांनी त्यांचा अहवाल उत्पादन शुल्क विभागाचे प्रमुख सिसोदिया यांना पाठवीत कुमार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे मागितली. याच अहवालाची एक प्रत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि नायब राज्यपाल सक्सेना यांनाही त्याच दिवशी पाठविण्यात आली. ईडीने आपल्या तक्रारीत म्हटले की, संजय सिंह यांच्या माध्यमातून दिनेश अरोरा हा सिसोदिया यांच्या संपर्कात आला. संजय सिंह यांच्या विनंतीवरून अरोराने अनेक रेस्टॉरंटमालकांशी चर्चा केली, अशी माहिती अरोराने तपास यंत्रणेला दिल्याचा दावा ईडीने केला आहे.आता एवढ्या आरोपावरून संजय सिंह यांना अटक केल्याने न्यायालयाने ईडीला फटकारले आहे.




# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेसाठी १ हजार ४९६ कोटी निधी वितरित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या दोन्हीही योजनांमधून लाभार्थींना दरमहा वेळेवर अनुदान मिळावे यासाठी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत ५५६ कोटी रुपये तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतंर्गत ९४० कोटी रुपये असा एकूण १,४९६ कोटी रुपये इतका निधी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून वितरित करण्यात आला असून लाभार्थींना तो तत्काळ वाटप करावा अशा सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेतंर्गत किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत: चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहित स्त्री. तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो.

या योजनेमध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा २१ हजार रुपये पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र लाभार्थींना १५०० रुपये दरमहा अर्थसहाय्य दिले जाते. तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्र्यरेषेखालील यादीच्या कुटुंबात नाव असलेल्या व २१ हजार रुपये पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील पात्र लाभार्थीस दरमहा १५०० रुपये अर्थसहाय्य देण्यात येते.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या योजनांचे स्वरुप विचारात घेऊन या पुढील काळात योजनेतील लाभार्थींना तातडीने अर्थसहाय्य वितरीत होण्यासाठी नियोजन करावे, अशा सूचनाही सचिव श्री. भांगे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# जिल्हा वार्षिक योजनेतील निधीच्या खर्चाचे नियोजन फेब्रुवारी अखेर करा - पालकमंत्री हसन मुश्रीफ

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून खर्च करावयाच्या विकास निधीच्या खर्चाचे नियोजन फेब्रुवारी अखेर करा, अशा सूचना पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. मुश्रीफ बोलत होते. दरम्यान कोल्हापूर शहरातील खड्डे नवरात्र उत्सव सुरू होण्यापूर्वी भरा, अशा सूचनाही मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिल्या.

बैठकीत मंत्री श्री. मुश्रीफ यांनी कोल्हापूर शहरातील रस्त्यांसाठी भरीव निधी देऊन रस्ते चकाचक करू, असे सांगितले. तोपर्यंत नवरात्र उत्सव सुरू होण्यापूर्वी शहरातील खड्डे भरण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. आरोग्य विभागाच्या चर्चेत मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, आरोग्य विभागाची प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये ही व्यवस्था बळकट करा. त्यामुळे, जिल्ह्याच्या ठिकाणावरील सिव्हील ल हॉस्पिटलांवरील ताण कमी येईल.

या बैठकीत मंत्री श्री. मुश्रीफ यांनी शिक्षण, आरोग्य, कृषी, विशेष घटक योजना, काळमवाडी धरणाची गळती या विषयांचाही आढावा घेतला.

या बैठकीला आमदार राजेश पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कोल्हापूर महापालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख या प्रमुखांसह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# महाज्योती महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महावाङ्मय प्रकाशित करणार : मंत्री अतुल सावे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचार आणि कार्याची माहिती साहित्यरुपाने जनसामान्यांना सहज उपलब्ध होण्याच्यादृष्टीने महाज्योतीच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महावाङ्मय प्रकाशित करण्यात येईल, अशी घोषणा इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर येथील मंडळाच्या आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संचालक प्रवीण देवरे प्रकल्प व्यवस्थापक कुणाल शिरसाठे व इतर अधिकारी उपस्थित होते.


मंत्री अतुल सावे

मंत्री श्री. सावे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महावाङ्मय प्रकाशित करण्याचा ठराव संमत करण्यात आला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रम व कार्यक्रम राबविण्यासाठी १० लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला. याशिवाय सारथीच्या धर्तीवर महाज्योतीच्या लाभार्थ्यांनादेखील समान लाभ देण्याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.

श्री. सावे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या एकत्रित समग्र वाङ्मयाच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन करण्यात करण्यात आले. महाज्योतीच्या जेईई/नीट/एमएचटी-सीईटी योजनेतील विद्यार्थ्यांना टॅब व सीमचे आणि कौशल्य विकास प्रशिक्षणात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगार पत्राचे वाटपही यावेळी करण्यात आले.

# ठाणेकरांच्या वेगवान,सुलभ प्रवासासाठी रिंग मेट्रो प्रकल्प आवश्यक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** वाढते शहरीकरण आणि त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी महाराष्ट्रात वेगाने सुरू आहे. मुंबई सोबतच ठाणेवासियांना देखील वेगवान आणि सुलभ प्रवासासाठी मेट्रो प्रकल्पाची कामे सुरू आहेत. ठाण्याचा वाढता विस्तार लक्षात घेऊन 'ठाणे रिंग मेट्रो प्रकल्प' काळाची गरज असल्याचा मुद्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केंद्रीय शहरे विकासमंत्र्यांसमोर मांडला.



नवी दिल्ली येथे केंद्रीय गृह मंत्रालयाने आयोजित केलेल्या बैठकीसाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी केंद्रीय शहरे विकास मंत्री हरदीप सिंह पुरी यांची भेट घेतली. सामान्य नागरिकांना सार्वजनिक दळणवळणाची सुविधा आरामदायी आणि गतिमान आवश्यक आहे या तळमळीतून मुख्यमंत्री श्री. शिंदे आज दिल्ली भेटीत त्यांनी ठाणेकरांसाठी रिंग मेट्रो प्रकल्प किती गरजेचा आहे, हे सांगितले.

याभेटीत महाराष्ट्राच्या नागरी भागातील विविध मूलभूत आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत चर्चा करण्यात आली. ठाणे रिंग मेट्रो प्रकल्पाचा पाठपुरावा करताना मेट्रो कोचची संख्या वाढवावी अशी मागणी देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

विज्ञान भवनातील डाव्या विचारसरणीमुळे निर्माण झालेल्या उग्रवादाच्या परिस्थितीबाबतची बैठक आटोपून मुख्यमंत्री श्री. शिंदे लगेचच केंद्रीय शहरे विकास मंत्री श्री. पुरी यांची भेट घेतली. त्यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर उपस्थित होते.

महाराष्ट्रात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांना केंद्र शासनाचे सहकार्य लाभत आहे. त्यामुळे हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीत मुख्यमंत्र्यांची केंद्रीय मंत्र्यांसमवेत ठाणे मेट्रोविषयी सविस्तर चर्चा झाली. ठाणे शहरात सध्या दोन मेट्रो प्रकल्पांचे काम सुरू आहे. शहराचा विस्तार होत असून तसेच शहर-जिल्ह्याची लोकसंख्या वाढत आहे. ठाण्यातील एकाच रेल्वे स्थानकावरुन ७ ते ८ लाख प्रवाशांची वर्दळ आहे. त्यामुळे २९ किमी लांबीचा ठाणे रिंग मेट्रोचा सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी केंद्राला सादर केला असून त्याला मान्यता द्यावी, अशी मागणी करतानाच मेट्रो कोचची संख्या वाढविण्याची विनंतीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

सद्यस्थितीत आणि भविष्याच्या दृष्टीने मेट्रो कोच वाढविणे आवश्यक आहे. रिंग मेट्रोच्या प्रकल्प अहवालाला मान्यता देतानाच मेट्रो कोचची संख्या वाढवावी या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या मागणीवर केंद्रीय मंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही दिली. महाराष्ट्रातील नागरी भागात सुरु असलेल्या विविध प्रकल्पांविषयी यावेळी चर्चा करण्यात आली.




दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस






# शरद पवार, जयंत पाटील यांना सोडून गेलेल्यांना भविष्यात पश्चाताप होणार : अविनाश पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** शरदचंद्र पवार, राज्याचे नेते आमदार जयंतराव पाटील यांना सोडून गेलेल्यांना भविष्यात मोठा पश्चाताप होणार आहे असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सांगली जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील यांनी व्यक्त केले. आटपाडी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व विभागांचे सर्व पदाधिकारी, गाव शहर तालुका जिल्हा राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांच्या महत्वपूर्ण बैठकीत अविनाश पाटील यांनी हे मत व्यक्त केले.



**आटपाडी : आटपाडी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत बोलताना जिल्हाध्यक्ष अविनाश पाटील**

राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब पाटील, आटपाडी तालुका अध्यक्ष हणमंतराव देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याकचे प्रदेशचे महासचिव सादिक खाटीक, युवक राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष सुरज पाटील, माजी सभापती विजयसिंह पाटील, ज्येष्ट नेते आनंदरावबापू पाटील, विष्णुपंत पाटील, राष्ट्रवादी ओबीसी जिल्हाध्यक्ष जालींदर कटरे, तालुका उपाध्यक्ष दत्ता यमगर, सोशल मिडीया तालुका अध्यक्ष किशोर गायकवाड, तालुका सरचिटणीस विजय पुजारी, समाधान भोसले, खरसुंडीचे लाला भिसे, मदन पुजारी, संजय शिनगारे सांगली, विश्वजीत सरगर तळेवाडी, सुभाष मोरे, अजिनाथ जावीर, विनोद बनसोडे दिघंची, आशीष जाधव पिंपरी खुर्द, दीपक पाटील कामथ, गणेश ऐवळे, दत्ता रावळ, राहुल रेड्डी आटपाडी, सागर सोहनी घाणंद, धुळाजी ठेंगले बनपूरी इत्यादी उपस्थित होते.

इंडिया आघाडीची देशात आणि राज्यात प्रचंड बहुमताने सत्ता येणार आहे. भारतीय जनता पक्षाचा दारुण पराभव होणार आहे. विधानसभा निवडणूकीनंतर राज्याच्या महाविकास आघाडीचे अर्थात इंडिया आघाडीचे नेते म्हणून जयंतराव पाटील हेच मुख्यमंत्री होणार असल्याने प्रत्येक निष्ठावान कार्यकर्त्याला आमदारकीच्या ताकदीचे बळ मिळणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या चौफेर व नेत्रदीपक वाढीसाठी कार्यकर्त्यांनी सामान्य माणुस, शेतकरी, कष्टकरी, उपेक्षित, वंचित, मागास, अल्पसंख्याक, महिला, युवा शक्तीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारधारेशी जोडावे असे आवाहन अविनाश पाटील यांनी केले आहे.

खानापूर आटपाडी मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस सर्वांनी एकजुटीने, एकदिलाने कार्य करीत जयंतराव पाटील यांच्या नेतृत्वाला मोठी बळकटी द्यावी. आम्ही, जिल्ह्याचे, मतदार संघाचे सर्व पदाधिकारी तुमच्या प्रत्येक प्रश्न समस्या बाबी बाबतीत पुर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे राहणार असल्याचेही अविनाश पाटील यांनी यावेळी सांगितले.

# वैभव गोरड, शरद गोरड यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**निंबवडे/राघव मेटकरी :** सातारा जिल्ह्यातील दहिवडी येथे धनगर समाजाच्या विविध ज्वलंत प्रश्नावर आमरण उपोषण करणारे वैभव गोरड व शरद गोरड या स्वाभिमानी धनगर समाजाच्या तरुणांचा विभुतवाडी ता. आटपाडी येथे प्रा. नारायण खरजे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



**विभूतवाडी : येथे वैभव गोरड व शरद गोरड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित प्रा. नारायण खरजे व मान्यवर**

पोलिस पाटील संजय थोरात, रामचंद्र पावणे, युवा नेते वैभव पावणे, कॉन्ट्रॅक्टर विवेक पावणे, युवा नेते मंगेश खरजे, सूरज लोहार, रामचंद्र वाघमोडे, लक्ष्मण खरजे, हैबत खताळ, महेश खरजे, बापू खताळ व पश्चिम महाराष्ट्र सामाजिक फाउंडेशन पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. नारायण खरजे म्हणाले. संपूर्ण सातारा जिल्हा तसेच राज्याने दखल घेतलेल्या या स्वाभिमानी युवकांनी गेल्या कित्येक वर्षांच्या रखडलेल्या सामाजिक समस्येसाठी पाऊल उचलले. आणि या त्यांच्या लढ्याला नक्कीच प्रथम दर्शनी यश आले. अजून बरीच लढाई बाकी आहे. सर्वांनी अशा प्रामाणिक समाजासाठी काम करीत असलेल्या तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहाणे आवश्यक आहे.

# अल्पसंख्यांक अत्याचार प्रतिबंधक कायदा तयार करा : गब्बार काझी



**कराड : अल्पसंख्यांक अत्याचार प्रतिबंधक कायदा तयार करा व त्याची कडक अंमलबजावणी करावी या मागणीचे निवेदन देताना उपस्थित मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** अल्पसंख्यक सुरक्षा कायदा लवकरात लवकर व्हावा व अल्पसंख्याक समाजाला अट्रासिटी कायद्याची अंमलबजावणी करावी व मुस्लिम समाजाच्या धार्मिक ठिकाणी हल्ले करणाऱ्याच्या विरोधात कडक कायदा व्हावा अशी मागणी गब्बार काझी यांनी केली. मुस्लिम समाजाला शैक्षणिक व नोकरीत आरक्षण मिळावे अशा विविध मागण्यासाठी दिनांक ०३ पासून कराड येथील तहसिल कार्यालयापुढे समता पर्व समिती माध्यमातून मुस्लिम अल्पसंख्याक समाजातील कार्यकर्ते उपोषणाला बसले आहेत.

अलिकडच्या काळात अल्पसंख्याक समाजबांधवांवर होत असलेले हल्ले अत्याचार अन्याय या मुळे समाजात भितिचे वातावरण निर्माण होते आहे. यासर्व मागण्यासाठी उपोषण करीत असलेल्या उपोषणाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे उपाध्यक्ष झाकीर पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली माण तालुका राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष गब्बार काझी व सर्व मुस्लिम बांधवांचा पाठिंबा कराड तहसिल कार्यालय येथे पत्र देऊन व उपोषण ठिकाणी हजर राहून जाहीर पाठिंबा दिला.

# बदनामीची भिती दाखवून खंडणीची मागणी

## यु.टी. जाधव : तोतया पत्रकारांविरोधात गुन्हा करण्याबाबत पोलिसांना निवेदन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी /प्रतिनिधी :** बदनामीची भिती दाखवून खंडणीची मागणी केल्या प्रकरणी बोगस व तोतया पत्रकारांविरोधात गुन्हा करावी अशी मागणी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु.टी. जाधव यांनी आटपाडी पोलिसांनी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



**आटपाडी : पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांना निवेदन देताना यु.टी. जाधव व उपस्थित मान्यवर**

याबाबत यु.टी. जाधव म्हणाले, मी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचा दोन वेळा चेअरमन म्हणून कामकाज पाहिले आहे. शिवाय जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या छोट्या मोठ्या अडी अडचणी सोडविण्याचे प्रामाणिक कार्य करत असतो. तसेच शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक कार्यात अग्रभागी राहून आज पर्यंत काम करीत असल्याने आटपाडी तालुक्यातील व सांगली जिल्ह्यातील अनेक दैनिकांच्या पत्रकारांशी तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांशी माझा परिचय आला आहे.

त्यात आटपाडीतील काही अनधिकृत पोर्टल व तोतया पत्रकारांनी मला एका शिक्षकाच्या तक्रारी संदर्भात भेटण्यासाठी बोलावले. त्यांनी बोलावलेल्या ठिकाणी मी गेलो असता माझे काही विषय ऐकून घेण्याअगोदर त्यांनी एका शाळेच्या शिक्षकासंबंधाने तक्रारीचा पाढा वाचण्यास सुरुवात केली.

तेव्हा मी शिक्षक, पालक, संबंधित गाव व तालुक्याची बदनामी होणार नाही याची दक्षता घ्या, असे म्हणालो. तेव्हा त्यांनी मला आम्हा पत्रकारांकडे तुमचे अनेक वर्ष झाले दुर्लक्ष आहे. तेव्हा भरीव स्वरूपात लक्ष द्यावे. अशी विनंती केली असता मी त्यांना सहजगत्या तुम्हास एखादी जाहिरात देऊन सहकार्य करू असे सांगितले. परंतु त्यांनी माझ्या बोलण्याचा विपर्यास करीत माझ्या नावाची सोशल मिडिया न्युज पोर्टल व युट्युब चॅनेल द्वारे केली बदनामी केली.

त्यामुळे माझी जनमानसात असणारी प्रतिमा मलीन करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांनी केला आहे. शिवाय बैठकीतून उठल्यानंतर मठाच्या बाहेर मला प्रत्येकी ५० हजार रुपयांची मागणी केली. नाही तर आम्ही पालक, शिक्षक ,अधिकारी यांना सोडणार नाही अशी धमकी दिली. तुमच्या विरुद्ध तक्रार दाखल करू.अशी भीती दाखवून एवढ्यावरच न थांबता समाज माध्यमातून बदनामी केली असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

# आम. पडळकर यांची धनगर आरक्षण ‘जागर यात्रा’

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** मी प्रथम धनगर, मगच आमदार असे म्हणत गोपीचंद पडळकर यांनी पुन्हा एकदा धनगर आरक्षणाचा जागर करायला संपूर्ण महाराष्ट्रात धनगर जागर यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिली.



**आम. गोपीचंद पडळकर**


यात्रेचा पहिला टप्पा १२ ते १७ ऑक्टोबर दरम्यान केला जाईल. १२ ऑक्टोबर रोजी मराठवाडा, १३ ऑक्टोबर रोजी उत्तर महाराष्ट्र, १४ ऑक्टोबर रोजी विदर्भ, १६ ऑक्टोबर रोजी पश्चिम महाराष्ट्र आणि १७ ऑक्टोबर रोजी कोकण भागात ही यात्रा काढली जाणार आहे. तसेच धनगर जागर यात्रेच्या माध्यमातून आरक्षणाचा आणि हक्काचा लढा यशस्वी करण्यासाठी सर्व समाज बांधवांनी यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार पडळकर यांनी यावेळी केले.

याबाबत आमदार पडळकर म्हणाले, धनगर आरक्षणासाठी उभारलेल्या आंदोलनास राज्यातून प्रचंड प्रतिसाद लाभला होता. संपूर्ण समाज एकवटला होता. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून धनगर बांधवांना आरक्षण देण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनानंतर आज अखेर प्रत्यक्ष धनगर समाज बांधवांना आरक्षण मिळाले नाही. त्यामुळे आरक्षणाचा हक्क न्यायालयीन मार्गाने मिळविल्याशिवाय मी गप्प बसणार नाही. तुम्हा सर्वांच्या साथीनं हा लढा मी लढणार आहे आणि यशस्वी देखील करून दाखवणार आहे, असेही पडळकर म्हणाले.

# तर माझ्या सहीने निवडून आलेले सगळे उमेदवार बेकायदेशीर : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अजित पवारांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली आहे. अजित पवारांच्या गटाने आपणच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा दावा केला आहे. तसेच घड्याळ या पक्षचिन्हावरही दावा केला आहे. हे प्रकरण केंद्रीय निवडणूक आयोगाकडे गेलं असून याप्रकरणी आज (६ ऑक्टोबर) सुनावणी झाली. या सुनावणीवेळी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार निवडणूक आयोगात उपस्थित होते. दोन तास ही सुनावणी चालली. या सुनावणीवेळी अजित पवार गटाचे वकील मनिंदर सिंह यांनी आयोगासमोर अजित पवार गटाची बाजू मांडली.



**जयंत पाटील**

मनिंदर सिंह यांनी यावेळी जयंत पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी झालेली नियुक्ती बेकायदेशीर असल्याचा युक्तिवाद केला. या युक्तिवादावर जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. जयंत पाटील म्हणाले, मीच बेकायदेशीर असेन, तर माझी सही असलेला एबी फॉर्म भरून निवडून आलेले राष्ट्रवादीचे सगळे उमेदवार बेकायदेशीर ठरतील.

जयंत पाटील म्हणाले, माझी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर माझ्याच सहीने राष्ट्रवादीच्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या सर्व उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आले. मीच जर बेकायदेशीर असेन तर मग महाराष्ट्रातील सगळ्या (राष्ट्रवादी काँग्रेसच्या) निवडून आलेल्या आमदारांच्या निवडी बेकायदेशीर ठरवण्याचा डाव यात दिसतोय. पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी मी निवडणूक लढून निवडून आलोय. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनीच मला पत्र देऊन माझी पुन्हा निवड केली. माझ्याकडे प्रफुल पटेलांचंच पत्र असल्याचे ते म्हणाले.









# कोळा येथे यशस्वी खेळाडूंचा सत्कार संपन्न



कोळा : कुस्ती व बॉक्सिंग स्पर्धेमध्ये यश मिळविलेल्या समाधान कुदळे व दिक्षा मोरे यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोळा :** दौंड ता. पुणे या ठिकाणी पार पडलेल्या विभागीय कुस्ती-ग्रीको रोमन स्पर्धेत कोळा विद्यामंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोळा या प्रशालेचा विद्यार्थी साहिल समाधान कुदळे याने ५५ किलो वजनी गटात चमकदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन करून त्याची राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तसेच दिक्षा नंदकुमार मोरे हिची विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल या दोन्ही गुणी खेळाडूंचा व त्यांच्या पालकांचा सत्कार मुख्याध्यापक श्रीकांत लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.

सदर खेळाडूंना क्रीडा शिक्षक महादेव नरळे व सुनिल माळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. वरील विद्यार्थ्यांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सचिव म.श.घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके सर, खजिनदार शंकरराव सावंत, कार्यकारणी सदस्य विश्वेश्वर झपके आणि सर्व संस्था कार्यकारणी सदस्य, मुख्याध्यापक श्रीकांत लांडगे, पर्यवेक्षक रफिक मणेरी व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व कोळा ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अपघात सदृश्य ठिकाणी स्पीड ब्रेकर करा : विश्वंभर बाबर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** म्हसवड येथे वरचेवर रस्ता अपघात होणाऱ्या ठिकाणी आवश्यक त्या प्रमाणात स्पीड ब्रेकर निर्माण करण्याची मागणी प्रा.विश्वंभर बाबर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. याबाबतचे लेखी निवेदन सातारा सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव यांना देण्यात आले आहे.

गेल्या एक महिन्याच्या कालावधीत म्हसवड नजीकच्या मायणी चौकात दोन वेळा भीषण अपघात झाले. या अपघातात तीन व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर काहीजण गंभीर जखमी झाले. कुकुडवाड कडून म्हसवड मायणी चौकात येताना व रस्ता क्रॉस करून पुन्हा त्याच बाजूला जाताना वाहनधारक कसलाही विचार न करता वेगाने वाहन चालवतात. परिणामी अपघात हा ठरलेला असतो. सदर ठिकाणी नुकत्याच झालेल्या अपघातामुळे अनेक कुटुंब उध्वस्त झालेले आहेत,तर काहीजण कायमचे अपंग झाले आहेत. म्हसवड येथील मायणी चौक, सिद्धनाथ हायस्कूल चांदणी चौक, याबरोबरच क्रांतिवीर शैक्षणिक संकुलाच्या दोन्ही बाजूला आवश्यक त्या प्रमाणात स्पीड ब्रेकर करण्याची मागणी विश्वंभर बाबर यांनी सातारा कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव यांच्याकडे केलेली आहे.



म्हसवड : अपघात सदृश्य ठिकाणी स्पीड ब्रेकर करा या मागणी निवेदन देताना विश्वंभर बाबर

# सरपंचानेच पाडली तलाठी कार्यालयाची भिंत

## नागरीकांचे उपोषण गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर मागे

**कडेगाव :** खेराडे वांगी ता. कडेगांव येथील अज्ञात लोकांनी तलाठी कार्यालयाची भिंत जेसीबीच्या सहाय्याने पाडून शासकीय मालमत्तेचे नुकसान केले होते या संदर्भात दोषींवर कारवाई करण्यासाठी खेराडे वांगी गावातील नागरिकांनी बुधवार पासून तहसिलदार कार्यालयासमोर उपोषण चालू केले होते.

तहसिल कार्यालया समोर मोठ मोठ्या घोषणा देण्यात आल्या या उपोषणास सांगली जिल्हा षरीषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, कडेगाव चे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, भाजपा ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रकाश गडळे, शिवसेना कडेगाव तालुका अध्यक्ष प्रदीप कदम, सचिन जगताप, चंद्रकात पाटील, आबासाहेब करांडे, संभाजी यादव,सतीश जाधव, राजाराम पवार, गणेश पवार, संग्राम घार्गे, किशोर मिसाळ यांच्यासह अनेक राजकीय सामाजिक संघटनांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठींबा देऊन भिंत पाडणाऱ्या लोकांन वर चौकशी होवून कारवाई करण्यात संदर्भात निवेदने दिलेली होती.



कडेगाव : खेराडे वांगी गावातील ग्रामस्थांचे उपोषण स्थगित करताना दत्तूशेठ सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक आप्पासो पडळकर यांच्यासह ग्रामस्थ

तहसिलदार अजित शेलार यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर पोलसांनी सदर गुन्हाचा तपास केला असता, खेराडे वांगी गावच्या सरपंच अनिल सूर्यवंशी यांचाच या गुन्ह्यामध्येछ सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शासकीय मालमत्तेचे नुकसान करून तलाठी कार्यालयाची भिंत जेसीबीच्या साह्याने पाडल्याने सरपंच अनिल सूर्यवंशी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर जिल्हा सांगली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष दत्तूशेठ सूर्यवंशी, कडेगांव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आप्पासो पडळकर यांच्या हस्ते उपोषण स्थगित करण्यात आले.

# रमाई आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थीनी अर्ज करावेत : जयंत चाचरकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** रमाई आवास योजने अंतर्गत ग्रामपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना पक्के घर तसेच कच्च्या घराचे पक्के बांधकाम करणेकरिता तसेच शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदीस अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. यासाठी पात्र लाभार्थीनी अर्ज करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त जयंत चाचरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, रमाई आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती किंवा नवबौध्द संवर्गातील असावा, लाभार्थीचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षाचे असावे, अर्जदाराच्या कुटुंबाची कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रासाठी तीन लाख रूपये तसेच ग्रामीण क्षेत्रासाठी उत्पन्न मर्यादा एक लाख रूपये इतकी आहे. यासाठी महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रासाठी जागेचा ७/१२ उतारा किंवा मालमत्ता नोंदपत्र तसेच ग्रामीण क्षेत्रासाठी ८ अ उतारा. (अर्जदाराचे नावे आवश्यक), जातीचे प्रमाणपत्र, चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, डोमेशिअल/रहिवासी प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, आधार कार्ड, रेशन कार्ड, घरपट्टी/पाणीपट्टी/वीजबिल यापैकी एक (३ महिन्याच्या आतील) इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतर्गत महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रासाठी अनुदान रुपये २.५० लक्ष, ग्रामीण क्षेत्राकरिता अनुदान रुपये १.२० लक्ष आहे. यासाठी घर बांधकामाचे चटई क्षेत्र किमान ३० चौ. मीटर असणे आवश्यक आहे. असे पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

यासाठी अनुदान वितरणाची कार्यपध्दती घराचे बांधकाम सुरु करताना ५० टक्के, सुरु झालेल्या बांधकामाचा मुल्यांकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर ४० टक्के, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर - १० टक्के अशी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगाव रस्ता, सांगली, नगरपालिका क्षेत्राकरिता संबंधित नगरपरिषद/नगरपंचायत यांचेकडे तसेच ग्रामीण क्षेत्राकरिता संबंधित ग्रामपंचायत यांचेकडे अर्ज करता येईल. असेही पत्रकात कळविले आहे.

# रेल्वेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठीची सवलत पुन्हा सुरु करावी

## मंत्री दीपक केसरकर यांची रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी आज राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची रामटेक या शासकीय निवासस्थानी भेट घेतली.

याप्रसंगी श्री. केसरकर यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी रेल्वे तिकीट दरात असलेली सवलत पुन्हा सुरू करण्यात यावी. तसेच महालक्ष्मी आणि हरिप्रिया एक्सप्रेसचे जुने डबे बदलून मिळावेत, अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री श्री.दानवे यांच्याकडे पत्राद्वारे केली.



मुंबई : मंत्री दीपक केसरकर यांची रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे रेल्वे संबंधित निवेदनाच्या मागण्या सदंर्भात निवेदन देताना

मंत्री श्री.केसरकर म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक हे सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी रेल्वेला प्राधान्य देतात. त्यांना रेल्वे प्रवासात यापूर्वी लागू असलेली सवलत पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी मागणी अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आपल्याकडे केली आहे. यामुळे त्यांच्यावरील आर्थिक भार कमी होण्याबरोबरच त्यांना सुरक्षित आणि सुखद प्रवासाचा अनुभव घेता येणार आहे.

त्याचप्रमाणे कोल्हापूर येथे तिरूपती तसेच मुंबई येथून अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात. यासाठी उपलब्ध असलेल्या हरिप्रिया तसेच महालक्ष्मी एक्सप्रेसचे डबे जुने आणि गैरसोयीचे झाले असल्याने ते बदलून मिळण्याबाबत भाविक आणि प्रवाशांकडून विनंती करण्यात येत आहे. हे डबे बदलून नवीन डबे मिळाल्यास प्रवाशांचा रेल्वे प्रवास सुरक्षित आणि सुखद होऊ शकणार असल्याचे मंत्री श्री.केसरकर यांनी केंद्रीय राज्यमंत्री श्री.दानवे यांना सांगितले.

